आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२५ ऑक्टोबर २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मन की बात मधून श्रोत्यांशी संवाद साधणार
- लष्करी अधिकाऱ्यांच्या कल्याणासाठीच्या विविध उपक्रमांचं संरक्षणमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन
- देशातल्या आरोग्यक्षेत्रात जागतिक दर्जाचं संशोधन होण्यासाठी खाजगी क्षेत्राची भागीदारी आवश्यक असल्याचं केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञानमंत्र्यांचं प्रतिपादन
- अदानी उद्योगसमूहातल्या गुंतवणुकीबाबतचे आरोप एलआयसीने फेटाळले/ आरोपांची चौकशी संयुक्त संसदीय समितीमार्फत करण्याची काँग्रेसची मागणी
- ऑस्ट्रेलिया बरोबरचा एकदिवसीय क्रिकेट सामना भारताने जिंकला/ रोहित शर्माचं शतक

आणि

- ज्येष्ठ अभिनेते सतीश शहा यांचं निधन

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधतील. या कार्यक्रमाचा हा १२७ वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व प्रसारण सेवा, आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब चॅनल वर कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने नुकत्याच लागू केलेल्या जीएसटी दर सुधारणांमुळे गेल्या २२ सप्टेंबर पासून देशभरात बचत उत्सव सुरु झाला आहे. पादत्राणे उद्योगासाठी जीएसटी चे नवे  दर लागू झाल्यामुळे नागरिकांना त्याचा लाभ मिळत आहे. याबद्दल आमच्या प्रतिनिधीनं माहिती दिली.

**[VC- AMAN]**

*(जीएसटीच्या दर सुधारणांमुळे चर्मोद्योग आणि पादत्राणे उद्योगाला मोठा दिलासा मिळाला आहे. युवा उद्योजकांना दिलासा देण्याच्या उद्देशानं केलेल्या या सुधारणांमुळे*

*उत्पादनाचा खर्च कमी झाला आहे, तसंच दर्जेदार पादत्राणं ग्राहकांना परवडण्याजोगी झाली आहेत.*

*या नव्या कर रचने नुसार, चामोईस लेदर, लेदर फायबरपासून बनवलेलं कंपोझिशन लेदर, आणि टॅनिंग किंवा क्रस्टिंगनंतर तयार केलेल्या चामड्यावरचा जीएसटी दर १२ टक्क्यावरून ५ टक्के इतका कमी करण्यात आला आहे. यामुळे उत्पादनाच्या खर्चात लक्षणीय घट झाली असून, देशात चर्मोद्योगाला प्रोत्साहन मिळालं आहे.*

*नव्या कर रचनेनुसार अडीच हजार रुपयांपर्यंत किमतीच्या पादत्राणांवर आता १२ टक्क्या ऐवजी ५ टक्के जीएसटी आकारला जाईल. त्यामुळे आकर्षक आणि टिकाऊ पादत्राणं मध्यम उत्पन्न गटाच्या आवाक्यात येतील. त्याचप्रमाणे चामड्याशी संबंधित कामावरचा जीएसटी १२ टक्क्यावरून ५ टक्के करण्यात आल्यामुळे सूक्ष्म-लघु आणि मध्यम उद्योगांचा उत्पादन खर्च कमी होईल आणि या उद्योगांची स्पर्धात्मकता वाढेल.*
*या उपाययोजनांमुळे केवळ देशांतर्गत उत्पादनाला चालना मिळणार नसून, भारताची निर्यात क्षमताही बळकट होईल, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील आणि तरुणांच्या नेतृत्वाखालची उद्योजकता आणि उत्पादन क्षेत्रातलं स्वावलंबित्व वाढवण्याच्या सरकारच्या दृष्टिकोनालाही बळ मिळेल.)*

**<><><><>**

लष्करी अधिकाऱ्यांच्या कल्याणासाठीच्या विविध उपक्रमांचं उद्घाटन आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी केलं. राजस्थानात जैसलमीर इथं लष्करातल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परिषदेत सुरु केलेल्या उपक्रमांमधे लष्करासाठी डिजिटल डेटा संकलनाचा समावेश आहे. लष्करी जवानांना देशभरात रेल्वेने प्रवास करण्यासाठी उपयुक्त ठरेल अशा सैनिक यात्री मित्र अपचं उद्घाटनही राजनाथ सिंग यानी केलं.

**<><><><>**

देशातल्या आरोग्यक्षेत्रात जागतिक दर्जाचं संशोधन होण्यासाठी खाजगी क्षेत्राशी भागीदारी आवश्यक आहे असं आज केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री जितेंद्र सिंग यांनी सांगितलं. ते नवी दिल्लीत दिल्ली विद्यापीठाच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या ५४ व्या स्थापना दिन आणि पदवीदान समारंभात बोलत होते. दहा वर्षापूर्वी वैद्यकीय पदवीसाठी केवळ ४५ हजार सीट्स होत्या त्या आता १ लाख ५० हजारापर्यंत वाढल्याने वैद्यकीय

शिक्षणाचं लोकशाहीकरण झाल्याचं ते म्हणाले. आयुष्मान भारत, जनऔषधी केंद्र यासारख्या परिवर्तनशील उपक्रमांमुळे भारताच्या आरोग्यक्षेत्रात मोठा बदल घडून आल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

भारत देश येत्या दोन वर्षात मोबाईल फोनच्या सर्व सुट्या भागांचं देशांतर्गत उत्पादन करण्याचं उद्दिष्ट गाठेल, असा विश्वास इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती-तंत्रज्ञान मंत्री आश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केला आहे. ते आज नवी दिल्ली इथं बातमीदारांशी बोलत होते. चित्रफीती किंवा ऑनलाईन सामुग्रीची सत्यता पडताळ्यासाठी, त्यातलं तथ्य तपासणीसाठी एक चॅटबॉट देखील विकसित केला जात असून त्याच्या सहाय्यानं बनावट सामुग्रीचा प्रसार रोखला जाईल, असंही ते यावेळी म्हणाले. झोहो या देशात विकसित केलेल्या डिजीटल मंचावर बारा लाखांहून अधिक सरकारी कर्मचारी आल्याची माहीती वैष्णव यांनी दिली.

**<><><><>**

एलआयसी, अर्थात भारतीय आयुर्विमा महामंडळानं आपला निधी अदानी ग्रुप ऑफ कंपनीज मध्ये गुंतवण्यासाठी आणि बाह्य घटकांच्या प्रभावाखाली आपले गुंतवणुकीबाबतचे निर्णय घेण्यासाठी पथदर्शक आराखडा तयार केल्याचा आरोप करणाऱ्या वृत्ताचं एलआयसी नं खंडन केलं आहे. वॉशिंग्टन पोस्टनं हे वृत्त प्रसारित केलं होतं.

वॉशिंग्टन पोस्टने केलेले आरोप खोटे आणि निराधार असून, आपली सर्व गुंतवणूक एकनिष्ठता आणि योग्य ती दक्षता घेऊन केली जात असल्याचा पुनरुच्चार एलआयसी नं केला आहे. तसंच आपले निर्णय संचालक मंडळाने मंजूर केलेल्या धोरणांनुसार स्वतंत्रपणे घेतले जात असून, या प्रक्रियेत इतर कोणत्याही संस्थेची भूमिका नसल्याचं एलआयसी नं स्पष्ट केलं आहे.

दरम्यान, काँग्रेसनं या प्रकरणाची संयुक्त संसदीय समिती मार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे.

**<><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि विरोधी पक्षांची महागठबंधन आघाडी जोमाने प्रचारात गुंतल्या आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज खगारिया, मुंगेर आणि नालंदा अशा ३ ठिकाणी प्रचारसभा घेतल्या.

या दोन्ही आघाड्यांव्यतिरिक्त निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या जनसुराज पक्षाने आज मोतिहारी मधे रोड शो केला.

**<><><><>**

भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात पर्थ इथं रंगलेल्या आजच्या तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियाचा ९ गडी राखून पराभव केला. तीन सामन्यांच्या या मालिकेतील या आधीचे दोन्ही सामने आणि मालिका ऑस्ट्रेलियाने जिंकली आहे.

ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करत ४६ षटकं आणि  ४ चेंडूत २३६ धावा केल्या. भारतान केवळ ३८षटकं ३ चेंडूत ही धावसंख्या पार केली. रोहित शर्माच्या १२१ धावांच्या खेळीला विराट कोहलीनं ७४ धावा काढून चांगली साथ दिली. या दोघांच्या १६७ धावांच्या भागीदारीच्या जोरावर भारतानं हा विजय नोंदवला. रोहित शर्माला सामनावीर आणि मालिकावीराचा मान मिळाला.

**<><><><>**

ज्येष्ठ विनोदी अभिनेते सतीश शहा यांचं आज दुपारी अडीच वाजता मुंबईत निधन झालं. ते ७४ वर्षांचे होते.  त्यांना हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मूत्रपिंड निकामी झाल्याने आज दुपारी त्यांचं निधन झालं. त्यांच्या पार्थिवावर उद्या अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

ज्येष्ठ अभिनेता सतीश शहा यांचं आज मुंबईत निधन झालं. ते ७४ वर्षांचे होते. ये जो है जिंदगी या दूरचित्रवाणी मालिकेतल्या विविध रंगी भूमिका आणि साराभाई वर्सेस साराभाई या मालिकेतला इंदू या भूमिकांसाठी ओळखले जाणारे सतीश शहा यांनी   १९७२ मधे पुण्याच्या  फिल्म इन्स्टीट्युट मधून प्रशिक्षण पूर्ण केलं. छोट्या पडद्यावर त्यांनी ५० पेक्षा जास्त मालिकांमधे तर मोठ्या पडद्यावर सुमारे १५० चित्रपटांमधून भूमिका केल्या  जाने भी दो यारो या चित्रपटातल्या भूमिकेसाठी त्यांना फिल्मफेअर पुरस्कार मिळाला होता.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांनी सतीश शहा यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**//<><><><>//**